# प्रसंगानुभव

“तर काय? पंचवीस वर्षांचा अनुभव आहे माझा!”
काळ्याचे पांढरे झाल्यावरही घडलेल्या प्रसंगांतून साफ चुकीचे निष्कर्ष काढून वर असं ठणकावून सांगणारे लोक जगात दुर्मिळ नाहीत.
त्यांना ‘पंचवीस वर्षांचा अनुभव आहे’ याचा अर्थ त्यांना पंचवीस वर्षं अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होती. त्या संधीचं चीज करायची कुवत असलेला माणूसच खरा अनुभवी बनतो.

हरघडीला भोवती प्रसंग चालूच असतात. त्यांच्यातले शेलके तपशील आणि कार्यकारणभाव जाणून घेणं; त्याबद्दल विचार करून आपली प्रतिक्रिया ठरवणं म्हणजे जीवन खरोखर अनुभवणं. ही मोठी कला असते. सर्वसाधारण माणसांना फक्त मोठे प्रसंग अनुभवता येतात. इतर प्रसंगांतून त्यांना केवळ ठेचा लागतात. पण खरं शिक्षण अनुभवण्यातूनच होतं. गृहिणीने प्रत्येक पाककृतीतल्या खुब्या जाणून त्या अनुभवल्या तरच तिचा स्वयंपाक उत्तम साधतो.

अनुभव प्रत्यक्षच यावे लागतात असं नाही. यशस्वी डॉक्टर पेशंटच्या शरीरातली व्याधी गणिती अचूकपणाने अनुभवू शकतो. नामांकित वकील समोर आलेल्या मुद्द्यांवरून गुन्ह्याचा प्रसंग अनुभवतो; तो प्रसंग त्याच्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा रहातो. म्हणूनच त्यातले बारकावे नेमके हेरून तो गुन्हेगाराला पेचात पकडू शकतो.

प्रसंग तपशीलवार मांडून सांगता येणं ही त्याहून मोठी कला. प्रत्येक प्रसंगात अनेक तपशील असतात. त्यांतले नेमके कुठले त्याचं अनुभवात रूपांतर करतात ते हेरून तेवढेच प्रकर्षाने मांडले तरच वाचकाला हुबेहूब पुनःप्रत्यय येतो. कल्पनेने मनात प्रसंग उभे करून ते तपशीलवार अनुभवले की कथा-कादंबऱ्या लिहिता येतात. ज्यूल व्हर्न उभ्या आयुष्यात घरापासून वीस मैलांच्या पलीकडे गेला नाही. पण त्याने सायबेरियापासून चंद्रापर्यंतच्या प्रवासाचे भविष्यातलेही काल्पनिक अनुभव घेतले आणि अतिशय सुरस विज्ञानकथा लिहिल्या. त्यातल्या पाणबुडी, अंतरिक्षयान, बलून वगैरे कल्पना ‘ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति’ या उक्तीनुसार पुढे सत्यातही आल्या.

यशस्वी शिक्षक अशा कथा स्वतः तर अनुभवतोच पण त्या अशा शिकवतो की त्यायोगे विद्यार्थ्यांनाही त्या अनुभवता येतात. चांगला कीर्तनकार आपल्या रसाळ शैलीने श्रोत्यांना पुराणातल्या कथा अनुभवायला लावतो. कथा वाचताना, पुराण ऐकताना जे मनाने त्यातल्या नेमक्या तपशिलापर्यंत पोचून तो अनुभवू शकतात त्यांनाच त्या लेखनाचा, कीर्तनाचा खरा आनंद घेता येतो. नाटकातल्या पात्रांचं काल्पनिक जीवन अनुभवून ते प्रेक्षकांपर्यंत पोचवू शकणारे लोक

उत्तम अभिनेते होतात. गुन्हा केल्यावर तिथल्या भोवतालच्या माणसांच्या आणि पोलिसांच्या प्रतिक्षिप्त आणि विचारपूर्वक क्रिया आणि त्यावरच्या आपल्या स्वतःच्याही प्रतिक्रिया ज्याला गुन्हा करण्यापूर्वीच अनुभवून बघता येतात तो नटवरलालसारखा कमालीचा यशस्वी भामटा बनतो. अनुभवाने जीवन व्यापक बनतं; यशस्वी होतं. येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाचा अनुभव बनवून त्यातून शिकत रहायची क्षमता जीवनाच्या रंगमंचावरच्या पहिल्या प्रवेशापासूनच अंगी बाणवली तरच ते तीन अंकी नाटक उत्कृष्ट वठवता येतं.

डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

('esakal' च्या सौजन्याने)